

# उच्चपद प्राप्तीसाठी वास्तुशास्त्र

नैऋत्य दिशा म्हणजे दक्षिण व पश्चिम यांच्यामधील दिशा व पंचमहाभूतांपैकी पृथ्वी तत्वाचे स्थान. सर्वप्रथम अशा उच्च पदस्थ व्यक्तीच्या घरी त्याचे मुख्य शयनगृह नैऋत्य दिशेसच असणे आवश्यक आहे. तसेच ही नैऋत्य दिशा पूर्णतः वास्तूदोष विरहित असावी कारण याच मुख्य शयनगृहामुळे (नैऋत्य दिशेस) त्या व्यक्तीला स्थैर्य, आत्मविश्वास, नेतृत्वगुणशक्ती व प्रभुत्व गाजविण्याची शक्ती प्राप्त होत असते.

कुठल्याही क्षेत्रात यश मिळविण्यासाठी ज्ञान, मेहनत, चिकाटी व नशीब या चार गोष्टींची आवश्यकता असते. परंतु वास्तुशास्त्राचा अभ्यास केल्यापासून आजपर्यंत ज्या हजारो विविध घरांचे व विविध वास्तूंचे वास्तुशास्त्रीय विश्लेषण केले आहे त्यावरून मी अगदी ठामपणे सांगू इच्छितो की वरील चार तत्वांसोबत पाचवे तत्व वास्तुशास्त्र त्यासोबत जोडणे अतिमहत्वाचे आहे. कारण ज्ञान, मेहनत, चिकाटी व नशीब यांची साथ मिळून सुध्दा अनेक उद्योगधंदे व त्या उद्योगधंद्याचे व्यवस्थापक पूर्णपणे यशस्वी होऊ शकलेले नाहीत. किंबहुना त्यांच्या पात्रतेपेक्षा खूपच कमी वा अल्प यश त्यांना मिळालेले आहे. अगदी काही क्षेत्रांमध्ये आपली मक्तेदारी व आयात पर्याय असलेले उद्योग वास्तुशास्त्रीय तत्वांचा अंगीकार करताच मृतप्राय वस्तूंमध्ये संजीवनी प्राप्त होऊन यशाच्या मार्गावर उधळलेल्या वारूंप्रमाणे धावू लागल्याचे माझे अनुभव आहेत. माझेच नव्हे तर या देशात कार्यरत असलेल्या अनेक वास्तू तज्ज्ञांचे हे असे अनेक अनुभव आहेत.

ही पाच तत्वे पंचमहाभूतांसारखी महत्वपूर्ण भूमिका निभावीत व्यक्तीला व त्याच्या व्यवसायाला यशाच्या शिखरावर नेऊन पोहचवितात. व्यवसायाच्या व उद्योगधंद्याच्या यशात सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे मूळ व्यवस्थापकाच्या घराचे वास्तुशास्त्र तसेच त्याच्या कार्यस्थानाचे वास्तुशास्त्र दोघांचेही महत्व समान असते. मूलतः घराचे वास्तुशास्त्र त्या व्यवस्थापकाला शारीरिक व मानसिकदृष्ट्या तंदुरुस्त बनवित असतं ज्याआधारे 'सशक्त शरीर व शक्तीशाली मन' असलेली व्यक्ती असे त्याचे वर्णन होते. ज्याआधारे तो आपल्या कार्यात व्यवस्थितपणे निर्णय घेतो व आपल्या व्यवसायाला यशाच्या शिखरावर नेतो. तर त्याच्या कार्यस्थानाचे वास्तुशास्त्र त्यांच्या उद्योगधंद्याला गती-प्रगती मिळवून देण्याचे काम करीत असतो.

### वास्तुशास्त्राद्वारे प्रगती पथावर

आजकाल तीव्र स्पर्धेमुळे उद्योगधंद्यात टिकाव धरून रहाणे फारच कठीण; त्यात प्रगती साधणे म्हणजे महाकठीण. एखादा साधा

निर्णयसुध्दा अनेक मोठी संकटे निर्माण करु शकतो. मग जर धोरणात्मक व दूरगामी निर्णय अंमलात आणण्यासाठी किती मोठी सावधता बाळगावी लागत असेल याची आपण कल्पना करु शकता. त्यामुळे अशा सर्व प्रसंगात यश मिळविण्यासाठी व उद्योगधंदा वाढविण्यासाठी मनुष्याला प्रखर आत्मविश्वास, कणखर नेतृत्वगुण, उत्कृष्ट वाक्‌चातुर्य, संयमशील स्वभाव, दूरदृष्टी, सततचा वाढता जनसंपर्क, उपलब्ध साधनांचा योग्य प्रकारे उपयोग करून घेणे, आर्थिक व वास्तव स्थितीचे भान, आघात पचविण्याची शक्ती व कायम गतीमानता ठेवण्याची प्रवृत्ती असणे आवश्यक आहे. मी उद्योगांच्या व्यवस्थापनाचा वा व्यवस्थापक शास्त्राचा तज्ञ नाही परंतु आजपर्यंत वास्तुशास्त्राच्या निमित्ताने ज्या अनेक उच्च पदस्थांच्या घराचे अथवा कार्यस्थानाचे वास्तुशास्त्रीय विश्लेषण केलेले आहे त्याआधारे मी स्वतः काढलेले निष्कर्ष आहेत. जे योग्य असतील परंतु कदाचित अपूर्ण सुध्दा असू शकतील.

सर्वप्रथम अशा उच्च पदस्थ व्यक्तीच्या घरी त्याचे मुख्य शयनगृह नैऋत्य दिशेसच असणे आवश्यक आहे. तसेच ही नैऋत्य दिशा पूर्णतः वास्तूदोष विरहित असावी कारण याच मुख्य शयनगृहामुळे (नैऋत्य दिशेस) त्या व्यक्तीला स्थैर्य, आत्मविश्वास, नेतृत्वगुणशक्ती व प्रभुत्व गाजविण्याची शक्ती प्राप्त होत असते. नैऋत्य दिशा म्हणजे दक्षिण व पश्चिम यांच्यामधील दिशा व पंचमहाभूतांपैकी पृथ्वी तत्वाचे स्थान. नैऋत्य दिशा म्हणजे राक्षसी तत्वाचे द्योतक, म्हणजेच आघात सहन करण्याची प्रवृत्ती विकसित करण्यास योग्य; तर पृथ्वीतत्व मनुष्याला आत्मविश्वास, नेतृत्वगुण, दुसऱ्यांवर कुरघोडी करण्याची शक्ती व स्थैर्य देत असतो. आपण आपल्या आयुष्यातील साधारणतः एक तृतीयांश भाग शयनगृहात घालवितो, किमान सहा तास झोप व तदनुषंगाने अन्य एक ते दोन तास म्हणजे दिवसाच्या चोवीस तासातील एक तृतीयांश भाग. अशा या नैऋत्य दिशेच्या मुख्य शयनगृहात आपण नेहमी डोके दक्षिणेला व पाय उत्तरेस करून झोपणे अतीउत्तम म्हणजे आपले शरीर पृथ्वीच्या विद्युत चुंबकीय प्रभावात स्थिरावते. त्याचमुळे आपला रक्तदाब संतुलीत रहातो व आपली पचनक्रिया व्यवस्थितपणे चालते. म्हणजेच तुमचे आरोग्य पूर्णपणे तंदुरुस्त रहाण्यास पोषक वातावरण तुम्हाला नैऋत्य दिशेच्या शयनगृहातून मिळते. यातून एक गोष्ट होते ती म्हणजे उद्योगधंद्यामध्ये यश मिळविण्यासाठी वास्तुशास्त्रदृष्ट्या सिध्दांत एक म्हणजे तुमचे शयनगृह नैऋत्य दिशेलाच असले पाहिजे. एवढेच काय पण तुमचे कार्यालयसुध्दा मुळ वास्तूमध्ये नैऋत्य दिशेलाच असणे अत्यावश्यक आहे.

## करून तर पहा !

परंतु जर का कार्यप्रवणतेमुळे अथवा सतत कराव्या लागणाऱ्या दौऱ्यांमुळे नैऋत्य दिशेच्या शयनगृहाचे सातत्य पाळले जात नसेल किंवा तुमच्या गृहरचनेत तुमचा बेडरुम नैऋत्य दिशेत नसेल तर तुमच्या यशात मोठ्या प्रमाणावर अडथळे यऊ शकतात परंतु वेळीच जर योग्य उपाययोजना केल्या तर सदर दोषाचे दुष्परिणाम पूर्णतः नष्ट करून आपल्या यशाचा आलेख चढत्या दिशेने कायम ठेवता येतो. यासाठी काही विशिष्ट प्रकारचे यंत्र व पिरॅमिड्स वापरले तर यश हमखास राखता येते.

दुसरे महत्वाचे गुण म्हणजे उत्कृष्ट वाक्‌चातुर्य संयमशीलता व दूरदृष्टी या गुणांची पूर्तता करण्याची शक्ती पूर्व, उत्तर व ईशान्य दिशांमध्ये आहे. म्हणजेच उच्च पदस्थ व्यक्तीच्या घराचे प्रवेशद्वार ईशान्य दिशेला असणे अत्यंत लाभदायी असते. तर दिवाणखाना अथवा बैठकीची खोली उत्तर व पूर्व भागात विस्तारीत मोकळी जास्तीत जास्त दारे-खिडक्या असणारी व कमीतकमी सामान असलेली असावी. त्यामुळे वातावरण हलके व मोकळे रहाते. ईशान्य दिशेकडून येणारी सकारात्मक वैश्विक शक्ती तुमच्या घरात अधिकाधिक प्रमाणात येते व त्यामुळे वातावरण शुध्द व आनंदी रहाते.

याच ईशान्य भागात तुमचे देवघर असावे. तर उत्तर अथवा पूर्व भागात न्हाणीघर व जलसाठा असावा.

बैठकीच्या खोलीत तुमचे बसण्याचे स्थान त्या खोलीच्या नैऋत्य दिशेत असावे जेणेकरून तुमचे तोंड ईशान्य दिशेला असेल. त्यामुळे नैऋत्य दिशेतून मिळणारा आत्मविश्वास व ईशान्य दिशेस चेहरा केल्याने त्या दिशेतून मिळणारी सकारात्मक शक्ती यामुळे कुठल्याही चर्चेत अथवा समस्या निराकरणात तुम्ही प्रभावी व यशस्वी ठरतात.

उद्योगधंद्यात अथवा आपल्या कार्यात यशस्वी होण्यासाठी तुमची स्वतःची अध्यात्मिक बैठक उच्च कोटीची असावी. याचा अर्थ तुम्ही तासन्तास ईश्वर भक्तीत घालवावा असे नाही. परंतु योग्य प्रमाणात नक्की असावी. तसेच वरचेवर काही यज्ञविधी करणे उत्तम. ज्यामुळे तुमच्या यशाला नजर लागणार नाही किंवा कुठल्याही प्रकारचे ग्रहण लागणार नाही. अर्थात सुयोग्य व तज्ञ व्यक्तींचा सल्ला यासाठी आवश्यक आहे.

## वाढता जनसंपर्क

व्यवसायिक यशातील पुढचा आवश्यक मुध्दा वाढता जनसंपर्क व तो संपर्क कायम व्यावसायिक यशास हातभार लावणारा म्हणजे वृध्दींगत होणारा असा असावा. याबाबतीत वायव्य दिशा म्हणजे वायू तत्व फार महत्वाची भूमिका पार पाडत असते. परस्परसंबंधांमधील सौहार्दता, प्रेम, आपुलकी, समन्वय यात वायव्य दिशेच्या वास्तुशास्त्राचा प्रभाव फार मोठा असतो. वास्तुशास्त्रदृष्ट्या तुमच्या घराच्या वायव्य दिशेस शौचालय, अभ्यासिका, भांडारगृह, भोजनालय आदि योग्य असते, तर व्यावसायिक जागेत स्टोरेज, मार्केटींग विभाग तयार माल ठेवण्याचे स्थान असते. परंतु जर घराच्या वायव्य दिशेत वास्तुदोष निर्माण झाला तर अस्थिरता, चंचलता वाढते. तसेच मत्सरघाताचा त्रास वाढू लागतो. तर व्यापारी प्रतिष्ठानात या दोषामुळे परस्पर समन्वयात अडथळे येऊन कुणाचा पायपोस, कुणास नाही अथवा प्रत्येक जण दुसऱ्यावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करीत असतो. अशामुळे अंदाधुंदी माजते व जनसंपर्क व समन्वयात दरार निर्माण होऊन एकंदरीत व्यक्तिमत्व व व्यवसायावर परिणाम होतो.

त्यानंतर सतत प्रगतीशील रहाण्यासाठी तुमच्या कार्यात गतीमानता असणे आवश्यक असते व त्यात अग्नीतत्वाचं महत्व फार मोठं आहे. अग्नी म्हणजे उर्जा व उर्जा म्हणजे गती व गती म्हणजे प्रगती. त्यामुळे घर व कार्यस्थानात अग्नीतत्व योग्य प्रकारे स्थानापन्न करून या तत्वाचा उपयोग तुमच्या यशात चार चाँद पूर्ण करतो.

अशा प्रकारे उच्च पदस्थ व्यक्ती व उद्योगधंद्याच्या यशात वास्तुशास्त्राचे योगदान फार महत्वपूर्ण आहे. त्यामुळे ज्ञान, मेहनत, चिकाटी व नशीब वास्तुशास्त्र जोडले तर